# MARATHI (009)
# ANNUAL PAPER (2018-19)
# CLASS – X
# Answer key

---

## SECTION-A

| प्रश्न | उप प्रश्न | अपेक्षित उत्तर | गुणदान |
|---|---|---|---|
| 1 | | **खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा** | 06 |
| | 1 | नदी या शब्दासाठी समानार्थी शब्द - **सरिता.** | 1 |
| | 2 | राजेंद्रसिंहाचे मूळ गाव – दौसा \ राजस्थान मधील दौसा | 1 |
| | 3 | **उता-यास शीर्षके**–उता-**यास** समर्पक असे कोणतेही शीर्षक असावे.<br>(राजेंद्रसिंह एक सामाजिक कार्यकर्ता, राजस्थानचा कायापालट आणि राजेंद्रसिंह)<br>**किंवा** अधोरेखित शब्दाची जात त्यांनी - **सर्वनाम** | 1 |
| | 4 | राजेंद्रसिंह विश्वविद्यालयात असताना जवळच्या झोपडपट्टीत आग लागली. मित्रांसह ते संकटात सापडलेल्या माणसांना मदत करायला गेले. सर्वप्रकारे प्रयत्न करून त्यांनी आग विझवली. पण एवढ्यावरच ते थांबले नाहीत, पुढेही अनेक दिवस त्यांना जेवढी मदत ते करू शकत होत, तेवढी मदत त्यांनी केली. राजेंद्रसिंह यांच्या जीवनाने याच घटनेमुळे नवे वळण घेतले. | 3 |
| 2 | | **खालील उतारा वाचून त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.** | 06 |
| | 1 | अ – केवळ **धडाडी** दाखवून सर्व कामं होतात असं नाही. | 1 |
| | | ब – तिहार तुरूंगाची क्षमता **दोन हजार** कैद्यांची आहे. | 1 |
| | 2 | 1980 साली किरण बेदी पश्चिम दिल्लीच्या **जिल्हा पोलीस आयुक्त** पदावर होत्या. | 1 |
| | 3 | **उता-यास शीर्षक** – उता-यास समर्पक असे कोणतेही शीर्षक असावे. (किरण बेदी, किरण बेदींची तिहार जेलमधील कामगिरी) **किंवा**<br>हे **सर्व** लोक बेरोजगार आहेत. (अधोरेखित शब्दाची जात) विशेषण \ संख्यावाचक विशेषण \ अनिश्चित संख्यावाचक विशेषण. | 1 |
| | 4 | पश्चिम दिल्ली हा भाग त्याकाळी गुंडांचा, दरोडेखोरांचा प्रदेश म्हणून ओळखला जायचा. जिल्हा पोलीस आयुक्तपदाची सूत्र स्वीकारल्यावर इथल्या गुंडाना त्यांनी वठणीवर आणले. ते गुंड दारू गाळण्याचा धंदा करायचे पण या प्रश्नाच्या मुळाशी गेल्यावर त्यांना समजले की, हे सर्व लोक बेरोजगार आहेत. त्यावेळी त्यांनी यांना बँकांचे कर्ज मिळवून दिलं. जागा मिळवून दिली तेव्हा या माणसांनी आपला व्यवसाय बदलून टाकला. किरण बेदींनी गुंडांचे जीवनच बदलून चमत्कार घडवून आणला. | 2 |
| **SECTION-B** | | | |
| 3 | | **दिलेल्या मुददयांच्या आधारे निबंध लिहा.** | 7 |
| | | • **निबंधात खालील गोष्टीवर लक्ष द्यावे -** | |
| | | • विषयज्ञान, तर्कशक्ती व त्याची सलग मांडणी. | 1 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | • मुद्देसूदपणा. | 1 |
| | | • आकर्षक प्रारंभ व शेवट. | 1 |
| | | • म्हणी, वाक्प्रचार, काव्यपंक्ती यांचा यथायोग्य वापर. | 1 |
| | | • हस्ताक्षर व शुद्धलेखन. | 1 |
| | | • विरामचिन्हांचा यथायोग्य वापर. | 1 |
| | | • उपयोजन कौशल्य \ समर्पक शेवट. | 1 |
| | | **-वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे.** | |
| | <u>किंवा</u> | **दिलेल्या मुदद्यांच्या आधारे गोष्ट लिहून शीर्षक देऊन तात्पर्य लिहा.** | **7** |
| | | • **कथालेखनात खालील गोष्टीवर लक्ष द्यावे -** | |
| | | • शीर्षक. | 1 |
| | | • विषयाची योग्य मांडणी, मुद्देसूदपणा व कल्पकता . | 1 |
| | | • प्रारंभ व शेवट आकर्षक, रंजकता. | 1 |
| | | • म्हणी, वाक्प्रचार, यांचा योजकतेने वापर. | 1 |
| | | • आकर्षक शैली व संवाद . | 1 |
| | | • विरामचिन्हांचा यथायोग्य वापर . | 1 |
| | | • तात्पर्य. | 1 |
| | | **-वरील सर्व घटकांचा सारासारपूर्वक विचार करून गुणदान करावे.** | |
| **4** | | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा.** | **5** |
| | | • -पत्र लेखनासाठी आवश्यक बाबी - | |
| | | • प्रेषकाचे नाव, पत्ता व दिनांक पत्राच्या वरच्या उजव्या कोप-यात लिहावा. | ½ |
| | | • मायना - ज्यांना पत्र पाठवायचे त्यांना डावीकडे संबोधित करावे. | ½ |
| | | • विषय – मोजक्या शब्दात असावा. | 1 |
| | | • मजकूर – मजकूर विषयाशी संबधित त्रोटक व नेमका असावा, समर्पक, मुद्देसूद रचना, पाल्हाळ नसावे, भाषा व्यावहारिक व भारदस्त असावी. | 1½ |
| | | • शेवट व स्वाक्षरी - पत्राचा शेवट करताना उजवीकडील खालच्या कोप-यातील स्वाक्षरी . | ½ |
| | | • लिफाफा - योग्य ठिकाणी तिकिट व पिनकोडसह लिफाफा. | 1 |

## <u>SECTION-C</u>

| | | | |
|---|---|---|---|
| **5** | अ) | **सूचनेप्रमाणे लिहा. (कोणतेही चार)** | **4** |
| | 1 | कुसुमाग्रज - विशेषनाम. | 1 |
| | 2 | प्रभावीपणे – कियाविशेषण अव्यय. | 1 |
| | 3 | पिकलेली \ जास्त पिकलेली – विशेषण. | 1 |
| | 4 | वापरे ! – केवलप्रयोगी अव्यय. | 1 |
| | 5 | वर – शब्दयोगी अव्यय. | 1 |
| | 6 | म्हणून - उभयान्वयी अव्यय. | 1 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | आ) | **पुढील वाक्ये कंसातील सूचनानुसार लिहा. (कोणतेही दोन)** | **2** | |
| | 1 | आई मला खाऊ देते. - कर्तरी प्रयोग. | | 1 |
| | 2 | आजारी माणसांची काळजी घ्यायला नको का? - प्रश्नार्थक वाक्य<br>आजारी माणसांची काळजी घ्यावयास नको का? | | 1 |
| | 3 | चोराने परेशला मारले. - भावे प्रयोग | | 1 |
| | 4 | नयना वर्गात अनुपस्थित\ गैरहजर आहे.- होकारार्थी वाक्य | | 1 |
| | इ) | **सूचनेनुसार बदल करा. (कोणतेही दोन)** | 2 | |
| | 1 | **भूतकाळ** | | 1 |
| | 2 | **भविष्यकाळ** - मुले व्यायाम करतील / करणार असतील / करत असतील / करत राहतील / केला असेल. | | 1 |
| | 3 | **भूतकाळ** - तो सुंदर गाणे म्हणत होता / म्हणणार होता / म्हणत असे / त्याने सुंदर गाणे म्हटले. | | 1 |
| | 4 | **वर्तमानकाळ** - नीता चित्र काढते / काढणार आहे / काढले आहे / काढत असते . | | 1 |
| | ई) | **लिंग बदला. (कोणतेही दोन)** | **2** | |
| | 1 | माळी — माळीण | | 1 |
| | 2 | सेविका - सेवक | | 1 |
| | 3 | गोप - गोपी / गोपिका | | 1 |
| | 4 | गाय - बैल | | 1 |
| | उ ) | **वचन बदला. (कोणतेही दोन)** | **2** | |
| | 1 | विहीर - विहिरी | | 1 |
| | 2 | गाणे - गाणी | | 1 |
| | 3 | सुई — सुया | | 1 |
| | 4 | चांदणी - चांदण्या | | 1 |
| | ऊ) | **समानार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | **2** | |
| | 1 | पक्षी — खग, विहग, पाखरू, अंडज | | 1 |
| | 2 | पाय — पाऊल, पद, चरण | | 1 |
| | 3 | चंद्र — चांदोबा, सुधाकर, शशी, चांद, इंदू, हिमांशू, मयंक, राकेश, रजनीनाथ, रजनीकर, सोम, निशिकांत, रजनीकांत | | 1 |
| | 4 | छोटा — लहान, बारका, धाकटा | | 1 |
| | ए) | **विरूद्धार्थी शब्द लिहा. (कोणतेही दोन)** | **2** | |
| | 1 | आशा — निराशा | | 1 |
| | 2 | समान — असमान | | 1 |
| | 3 | फरक — साम्य, समानता, समान | | 1 |
| | 4 | हिंसक - अहिंसक | | 1 |

## SECTION-D

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | अ) | **योग्य पर्याय शोधून वाक्य पूर्ण लिहा. (कोणतेही चार)** | **4** |

| | | | |
|---|---|---|---|
| | 1 | मी तिच्या आईला म्हंटले "किती **गोंडस** बाळ आहे तुमचं!" | 1 |
| | 2 | माझ्या वैयक्तिक जीवनाच्या निराशेतही जगण्याची **आशा** चिवट राहिली. | 1 |
| | 3 | पुस्तकाची पानं म्हणजे **जीवनाचं** गाणं. | 1 |
| | 4 | त्याचा दिवाणखाना पाहून मी **थक्क** झालो . | 1 |
| | 5 | माणसांनी या पृथ्वीवर कसं जगावं हे शेवटी **माणसांनीच** ठरवायचं आहे. | 1 |
| | 6 | बाबांनी या प्रयोगासाठी स्वतःचे **शरीर** देऊ केले . | 1 |
| | आ) | **खालील प्रश्नांची उत्तरे पूर्ण वाक्यात लिहा . (कोणतेही सहा)** | 6 |
| | 1 | पन्हाळयाचा उरूस **तीन** दिवस चालतो. | 1 |
| | 2 | लेखक अक्षरज्ञानाचे वर्ग चालवायला **म्हसाळा** या खेड्यात जात . | 1 |
| | 3 | स्वामी विवेकानंदांच्या शिष्याचे नाव **आनंद** होते . | 1 |
| | 4 | नारायण सुर्वे यांच्या माझे विद्यापीठ पुस्तकाला **अकरा** पुरस्कार मिळाले . | 1 |
| | 5 | हिमालयामध्ये लेखकाने पूर्वी कधीही न ऐकलेला **शांततेचा** आवाज ऐकला . | 1 |
| | 6 | लेखिकेला परंपरेतील **संकुचितपणा, भेदाभेद, आपपरभाव** त्रासदायक वाटतात. | 1 |
| | 7 | **आता पावसाळा येणार आपले घर वाहून जाणार** ही गोष्ट कळल्यामुळे नागाची पिल्ले हबकून गेली. | 1 |
| | 8 | **शांतता सहजीवन आणि विकास** मानवी संस्कृतीचा हाच खरा अर्थ आहे . | 1 |
| 7 | अ) | **आकृतिबंध पूर्ण करा. (कोणतेही तीन)** | 4 |
| | 1 | विचार / आशा / आकांक्षा / शिक्षण / ज्ञान | 2 |
| | 2 | झाडू / चरखा | 2 |
| | 3 | मुक्त / स्वतंत्र | 2 |
| | 4 | थाळी भरून माहिती / कादंबरीची डिश / गणिताची खमंग मिरची / स्वीटमध्ये सुभाषित / भेळ / आईस्‍ क्रीम | 2 |
| | 5 | मुग्ध / अबोल / बुद्धिमान / करारी / प्रेमळ / पतिव्रता | 2 |
| | आ) | **30 ते 40 शब्दात उत्तरे लिहा . (कोणतेही दोन)** | 6 |
| | 1 | प्रस्तावना – पाठ – माणुसकीचा झरा लेखिका – चित्रलेखा विश्वास पुरंदरे (विकास आनंदवनाचा) वरोरा – श्रमश्रमाचा प्रयोग – तुळशीरामाची भेट व मृत्यू –– कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनाचे कार्य – स्वतःचे शरीर देण्याची तयारी – झाडाखाली दवाखाना – महारोग्यांना जगण्याची उभारी – आनंदवनाची निर्मिती. | 3 |
| | 2 | प्रस्तावना – पाठ – परिवर्तनाचे उत्सव लेखिका– विद्या बाळ (साकव) आनंदाची उधळमाधळ – राजकीय स्वरूप – सांडलवंड – वराती – लाऊडस्पीकर – ध्वनिप्रदूषण – आवाज व गर्दी – मौजमस्ती – सामाजिक भान नाही – दुस-यांसाठी उपद्रवी. | 3 |
| | 3 | प्रस्तावना – पाठ – मास्तर आणि मी लेखिका – कृष्णाबाई नारायण सुर्वे. (मास्तरांची सावली) पहिलाच आंतर्देशीय पुरस्कार – प्रथमच परदेशात – मार्क्सवर श्रद्धा – कम्युनिस्ट विचारसरणी कवितेतून मांडणा-या माणसाला कम्युनिस्टांच्याच देशात पुरस्कार मिळणे ही फार मोठी व मानाची गोष्ट होती – त्यांना आपलं माणूस वाटत असेल. | 3 |
| | 4 | प्रस्तावना – पाठ – काय राव पुस्तकराव! (किशोर जाने 2001) लेखक – श्री दासू हरिहरराव वैदय | 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पुस्तकरावाला पुढील गोष्टीचा त्रास - पाने फाटतात - पाने मुडपतात - अर्धवट वाचल्या नंतर खूण म्हणून मुडपतात - माळ्यावर डिक्कीत टाकतात - अंगाखाली चुरगळतात - नीट उपयोग करत नाहीत. | |
| 8 | अ) | **योग्य पर्याय निवडून वाक्ये परत लिहा. (कोणतेही चार)** | 4 |
| | 1 | घरे आणि शहरे पुन्हा निर्माण व्हावीत **एकाच** आकाराची. | 1 |
| | 2 | आजि सोनियाचा दिवस **दृष्टी** देखिले संतास।। | 1 |
| | 3 | वळण वाकड्या नदीत आहे **खळखळते** पाणी . | 1 |
| | 4 | **मंद्र** सप्तकात गाते एकतारी एकस्वर . | 1 |
| | 5 | दिसे **सांवळे** रूप त्याचे शिवारी. | 1 |
| | 6 | आपण सावित्रीच्या ज्योती आपण **रमाई**च्या वाती. | 1 |
| | आ) | **पूर्ण वाक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही तीन)** | 3 |
| | 1 | कवयित्री आश्लेषा महाजन यांनी **चंद, सूर्य अन् इथली माती** यांना लाख लाख प्रणाम केले आहेत. | 1 |
| | 2 | सोयराबाईनी **संसारसुखाला** / **संसाराला** मृगजळ असे म्हटले आहे . | 1 |
| | 3 | कवीच्या मते प्रलयानंतर निसर्गातील **नद्यांचे प्रवाह बदलावेत, खुरटी झुडपे आकाशाला भिडावीत** किंवा **सारा निसर्गच बदलावा.** | 1 |
| | 4 | 'जिथे राबती हात' या कवितेत **शेतकरी, पाथरवट, विणकर, लोहार** या कष्टक-यांचा उल्लेख केला आहे. | 1 |
| | 5 | संत सेना महाराजांच्या घरी दिवाळी दसरा पुढील वेळी असतो - **संत जेव्हा घरी येतात / संतचरण पाहिल्यावर / संताचे दर्शन झाल्यावर.** | 1 |
| 9 | अ) | **खालीलपैकी कोणत्याही एका काव्यपंक्तीचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.** | 3 |
| | 1 | प्रस्तावना – पद्य - प्रलय (मन आभाळून आलं) कवी - श्री रोहिदास भाऊराव पोटे.<br>अर्थः कवीच्या मते असा प्रलय व्हावा की जुनी बुरसटलेली समाजरचना या प्रलयामध्ये नष्ट व्हावी. प्रलयानंतर नवीन विचार. कष्ट करणे, घाम गाळणे, यातून कष्टाच्या भाकरीचा सुगंध मातीला यावा.<br>**किंवा**<br>आजकाल समाजामध्ये माणुसकी राहिली नाही तेव्हा हा संपूर्ण समाज प्रलयाने नष्ट व्हावा व माणसाचे व माणुसकीचे नाते अभेद्य होऊन माणसे माणसासारखी वागावीत अशी इच्छा व्यक्त केली आहे व माणसाचे व माणुसकीचे नाते या सोबतच कष्ट आणि मेहनतीने निर्माण झालेले समाधान प्राप्त व्हावे अशी अपेक्षा. माणूसपण कोणत्याही बंधनाने जखडलेले नसावे अशी अपेक्षा व्यक्त झाली आहे. | 3 |
| | 2 | प्रस्तावना – पद्य – एकत्वाचे गीत महान (गीतपुष्पांचा फुलोरा) कवयित्री – आश्लेषा शिरीष महाजन या काव्यपंक्तीत कवयित्री म्हणते की, भारत हा खंडप्राय देश असला तरी भारतामध्ये प्रांतावरोबरच भाषा, रूप, वेष व धर्म या बाबतीत बदल दिसूनही आपला भारत देश एक आहे. विभिन्नतेतील एकता प्रदर्शित करण्याचा प्रयत्न केला आहे. **किंवा**<br>आपल्याला सुंदर व दुर्मिळ मनुष्यजन्म या भारतभूमीत लाभला आहे. हा आमचा देश अल्ला असून तोच प्रभू व तोच भगवान आहे. भारतात जन्म मिळणे छानच पण हे जीवन फार दुर्मिळ आणि सुंदर आहे. शांती समाधानाचे मंदिर आम्ही येथे निर्माण करू कारण भारत हाच आमचा परमेश्वर आहे. 'सर्वधर्मसमभाव' असा सुरेख संगम याठिकाणी झालेला आहे. | 3 |

| | | | |
|---|---|---|---|
| | **3** | प्रस्तावना- पद्य – माझ्या घरट्यात (छुमछुम) कवी – श्री सूर्यकांत खांडेकर.<br>भौतिक श्रीमंतीपेक्षा मनाचा मोठेपणा स्पष्ट करताना कवी म्हणतात, माझ्या घरटयात माझ्या घरातील बालकांच्या मनात नवागत व्यक्तीसाठी अगत्य आहे. गरिबीत नापसंती व्यक्त न करता आनंदाने जीवन जगणे आहे. त्यात समाधान, नाराजी नाही, कपाळाला आठ्या नाही, घरात आनंद, सदैव बालकांच्या चेह-यावर हसू दिसते. | **3** |
| | **आ)** | **आकृतिबंध पूर्ण करा. ( कोणतेही तीन ) (आकृती काढणे व कोणतेही दोन उत्तरे अपेक्षित )** | 4 |
| | **1** | गंगा / हिमनग रांगा | **2** |
| | **2** | विषमतचे दगडगोटे अस्मानात उडावे / सूर्याच्या प्रखर उष्णतेने वितळून जावेत / विषमता मुळापासून नष्ट व्हावी. | **2** |
| | **3** | विणकर किंवा कापसाचे पटात रूपांतर करणारे कारागीर / पाथरवट. | **2** |
| प्र 10 | | **खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे 30 ते 40 शब्दात लिहा.** | 4 |
| | 1 | प्रस्तावना - पाठ – मुलांचे स्वप्न लेखिका – सोनाली प्रकाश नवांगुळ<br>चिनार व जुई गुणी मुल - त्यांना सर्वांना मदत करायची असते - झाड सर्वांना मदत करते म्हणून आपण झाडच व्हावे असे वाटते - झाड कोणतेही असो ते उपयोगीच पडते - फुलांचा छान वास येतो तसेच त्याची मुळं, खोड, पान, फळं असं सगळच उपयोगी व औषधी - ती गारेगार सावली देतात - मुळं मातीला घट्ट धरून ठेवतात त्यामुळे माती वाहून जात नाही - तिची धूप कमी होते -पक्ष्यांची घरटीही. | **2** |
| | **2** | प्रस्तावना - पाठ – गावाची संस्कृती हे गावाचे व्यक्तिमत्त्व. लेखक – आनंद यादव<br>पंढरपूर – चंद्रभागा नदीत स्नान, मन स्वच्छ करणारे स्नान – पावित्र्याचा स्पर्श – श्लोक, मंत्र, स्तोत्र म्हणतात – मनात विठ्ठलाचे ध्यान जागते ठेवत – स्नानानंतर विठ्ठल मंदिरात – नंतर घरी – भक्तियुक्त मानसिक वैशिष्ट्य दुस-या मराठी संस्कृतीत दिसणार नाही. | **2** |
| | **3** | प्रस्तावना - पाठ – नातवंडास पत्र. लेखिका – मृणालिनी साराभाई<br>पााणी पवित्र आहे याची जाण ठेवा - पर्वत, द-या, खोर, नद्या यातून पाणी – आशीर्वादस्वरूप पाणी – खबरदारी घ्या - पाण्याचा थेंबही वाया जाणार नाही याची दक्षता घ्या - देशातील जलस्त्रोत स्वच्छ ठेवावे – तशी शपथ घेणे. | **2** |